The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# संत साहित्याची प्रासंगिकता

**प्रा. मनीषा नेसरकर**
मराठी अध्ययन व संशोधन विभाग
राणी चन्नम्मा विद्यापीठ,बेळगावी, कर्नाटक

साहित्य हा मानवी संस्कृतीतील एक महत्त्वाचा घटक आहे. साहित्याची अनेक प्रयोजन अभ्यासकांनी सांगितलेली आहेत. थोडक्यात सांगायचं तर साहित्यामुळे जीवन सर्वांगानी समृद्ध होते. महाराष्ट्र संतांची भूमी मानला जाते. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतभर अनेक संत होऊन गेले. अगदी महाराष्ट्राइतकी समृद्ध परंपरा इतर राज्यांमध्ये नसली तरी संत आणि संत साहित्याला भारताच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारताच्या आध्यात्मिक आणि वैचारिक जडणघडणीमध्ये संतांचे खूप मोठे योगदान आहे. संतांनी केवळ भक्ती शिकवली नाही तर अध्यात्म आणि जीवनविचार दिला आणि मानवी जीवन समृद्ध केले. संतांनी जे साहित्य निर्माण करून करून ठेवले आहे ते स्थळ काळ परिस्थितीच्या मर्यादा ओलांडून सदासर्वकाळ मानवी जीवनाचे उन्नयन आणि मार्गदर्शन करणारे आहे. या अर्थानं ते अक्षर वाङ्मय आहे आणि त्यामुळेच केवळ भारतातीलच नव्हे तर इतर देशातील लोकही या साहित्याकडे आकर्षित होताना दिसतात. हा आपल्या देशाचा एक सांस्कृतिक ठेवा आहे. आपल्याकडे बाराव्या तेराव्या शतकापासून ही परंपरा जोमाने फोफावलेली दिसते इतकी वर्ष लोटली तरी हे साहित्य काल-परवा निर्माण झालं असावं इतकं ताज टवटवीत आहे. आणि आजच्या काळातही त्याची प्रासंगिकता किंवा प्रस्तुतता कमी झालेली नाही. संत साहित्यानंतरही एक समृद्ध अशी परंपरा आपल्याकडे होऊन गेली ज्यांनी समाजाची मानसिक बौद्धिक अध्यात्मिक जडणघडण केली. समाजाला सर्वार्थाने सुदृढ समृद्ध बनवले. पण अगदी अलीकडे गेल्या काही वर्षात साहित्य जगताने खूप विकृत वळण घेतले आहे. उत्तम साहित्य निर्मिती करण्यापेक्षा साहित्यातील गटतट, विकृत स्पर्धा, पुरस्कारांची देवाणघेवाण, साहित्याच्या दर्जापेक्षा आपलं साहित्यिकपण मिरवण्यातच बहुतांशी साहित्यिक मश्गुल आहेत.

अनेक नवनवीन विचार प्रवाह जन्माला आले आहेत साहित्याचा जीवनाशी प्रबोधनाशी संबंध जोडू नये त्याकडे केवळ कला म्हणून पहावे असे काही जणांचे मत आहे काही जण केवळ सत्य परिस्थिती मांडणे म्हणजे साहित्य त्यातून बोधाची वगैरे अपेक्षा करू नये असे सांगतात. काहींची साहित्यातील प्रबोधनाला हरकत नाही किंबहुना हिरीरीन प्रबोधन करतील; पण बोले तैसा चाले याला मात्र त्यांचा विरोध आहे. आमच्या साहित्याचा संबंध आमच्या वैयक्तिक चारित्र्याशी, वागणुकीशी जोडू नये असे काहीजण स्पष्टपणे सांगतात. त्यामुळे आणि त्यामुळेच समाजाच्या व्यथा पोटतिडकीने मांडणारे बरेचसे साहित्यिक समाज घटकांवर अन्याय करताना जराही कचरत नाहीत. उलट साहित्यिकांनी विक्षिप्तच वागलं पाहिजे असा काहींचा समज आहे आणि म्हणून काही जण जाणूनबुजून विक्षिप्तपणाचा बुरखा पांघरून स्वतःचा दबदबा निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न

करत आहेत. त्यांचे साहित्य किती योग्यतेचे असते माहित नाही पण 'साहित्यिकपण' मात्र जोमाने मिरवलं जातंय. साहित्य समाजाची भावनिक बौद्धिक आध्यात्मिक भूक भागवते. या विचाराला पूर्णपणे तडा गेला आहे. मुळात आज-काल साहित्य समाजापर्यंत पोहोचते आहे का? हा मोठा प्रश्न आज उभा आहे. साहित्य व्यवहार किंवा लेखन व्यवहार हा वाचकांसाठी, रसिकांसाठी आहे. याचा या सगळ्यामध्ये विसर पडून गेला आहे. तो केवळ पुरस्कारांमध्ये हरवून गेला आहे. या पार्श्वभूमीवर संतसाहित्याची प्रासंगिकता किंवा प्रस्तुतता आणखी तीव्रतेने जाणवते. पण दुर्दैवाने अशा साहित्यिक वातावरणामुळे समाज साहित्यापासूनच दुरावला आहे. त्यामुळे संत साहित्याकडे वळण तर फारच दूरची गोष्ट झाली. साहित्य व्यवहारातील या सगळ्या विकृतीमुळे ते साहित्यापासून दूर राहत आहेत. साहित्य हा घटक आपण एका व्याख्येत बसवू शकत नाही. त्याला अनेक बाजू आहेत; त्याची अनेक प्रयोजन आहेत; काहींना उत्तम उत्तम कल्पना उत्तम शब्दातून मांडणे म्हणजे साहित्य वाटतं. काहींना एखादा उत्तम अनुभव शब्दबद्ध करणे म्हणजे साहित्य वाटतं. काहींना वास्तवाचं चित्रण करणे म्हणजे साहित्य वाटतं. हे साहित्याचे विविध पैलू आहेत. ज्याची जशी प्रकृती तो त्या पद्धतीच्या लेखनाकडे वळतो. त्यामुळे अमुक एक म्हणजे साहित्य आणि अमुक एक म्हणजे साहित्य नव्हेच. याला काहीच अर्थ उरत नाही.

संत साहित्याचा विचार करताना मला वरील सर्व गोष्टींचं, संमिलन म्हणजे साहित्य वाटतं. या संत साहित्यालाही काहींनी जोरकस विरोध केला. संत साहित्य स्थितीवादी आहे, किंवा टाळकुट्यानी महाराष्ट्र बुडवला अशी टीकाही झाली, पण मला वाटते महाराष्ट्राच्या पुरोगामीत्वामध्ये संत साहित्याचा सिंहाचा वाटा राहिला आहे, आजही आहे आणि पुढेही राहील. गरज आहे ती या संत साहित्याची उत्तम प्रकारे विद्यार्थ्यांना, नव्या पिढीला ओळख करून देण्याची, त्यांच्यामध्ये बिंबवण्याची, पण ब-याच ठिकाणी आम्हा प्राध्यापक वर्गाची याबाबतची अनास्था आपल्या विद्यार्थ्यांना यापासून वंचित ठेवते आहे. ही खेदाची बाब आहे. त्यामुळेच नवी पिढी या साहित्याच्या योग्य आकलनापासून, आस्वादापासून वंचित आहे. या साहित्याबाबत त्यांच्या मनात टोकाची अनास्था आहे, प्रचंड गैरसमज पेरले गेलेले आहेत. त्यामुळे संत साहित्याकडे संकुचित दृष्टीने न पाहता, नव्यादृष्टीने, नव्या युगाच्या प्रकाशात आपण प्राध्यापक वर्गाने पाहिले पाहिजे व हा सांस्कृतिक ठेवा पुढील पिढीकडे संक्रमित केला पाहिजे. संतांनी माणसाला केवळ निवृत्तीवाद, वैराग्य, संन्यस्तवृत्ती, स्थितीवाद शिकविला हा काही लोकांनी हेतूतः निर्माण केलेला भ्रम दूर करण्याची नितांत गरज आहे. संतसाहित्य हे एक सुरी नाही तर अनेक उत्तम उत्तम गोष्टींचे संमिलन आहे धर्मकारण, अर्थकारण, समाजकारण,राजकारण, विज्ञान, शेती इत्यादी सर्व विषय त्यांच्या साहित्यामध्ये येतात. तत्कालीन सर्वच बाबतीत भरकटलेल्या समाजाला योग्य वाटेवर आणण्याचे; देशावर होणाऱ्या बहुस्तरीय आक्रमणामुळे हतबल झालेल्या मनाला बळ देण्याचे, संकटातही धैर्याने उभे राहण्याची शक्ती देण्याचं आजोड कार्य या संतांनी केले. नीतिमत्ता, चारित्र्य, पावित्र्य, देवत्वाचा आदर्श घालून देण्याचं कार्य संतांनी आपल्या कृतीतून आणि साहित्यातून केलं. आजची परिस्थिती यापेक्षा काय वेगळी आहे? नैतिक अध:पतनाने टोक गाठलेले आहे; साऱ्या निष्ठा धुळीला मिळाल्या आहेत; विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भरारी घेतलेल्या समाजात

अंधश्रद्धांचे, बुवाबाजीचे पीकही तितक्यात जोमाने वाढले आहे. अशावेळी संतसाहित्य पुन्हा एकदा दीपस्तंभाचे कार्य करू शकेल. आजही या साहित्याची प्रस्तुतता तितकीच अजोड आहे. संतसाहित्य केवळ आशयाच्या अंगानं वैविध्यपूर्ण नव्हतं तर अभंग, ओवी,टीका, आख्याने, भाष्यग्रंथ, महाकाव्य, पोवाडे, लावण्या,आरत्या, विराण्या, गवळणी इत्यादी साहित्यप्रकार त्यांनी लिलया हाताळले आणि यांची खासियत म्हणजे ते काल परवा लिहिल्यासारखे ताजे टवटवीत आहेत. आजकाल एखाद्या ग्रंथाला पुरस्कार मिळाला तर इतका सोशल मीडियाचा बोलवायला असून देखील ते लगेचच विस्मरणात जातं. पुन्हा ते किती जण वाचतात हा प्रश्न तर विचारांच्या पलीकडचा आहे. या साहित्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे गेयता. आज केवळ गरजेनुसार गेय रचना केली जाते. पण संत वांग्मयातील गेयता ही उस्फुर्त होती. आजही मराठी माणसाची सकाळ अभंगांनी होते आणि ते लहानथोर सगळ्यांच्याच लक्षात राहतात ते त्यांच्यातील आशय आणि अभिव्यक्तीच्या एकरुपतेमुळे, सहज सुंदर सोप्या अभिव्यक्तीमुळे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली ती केवळ आणि केवळ सामान्य लोकांना धर्म कळावा म्हणून. त्यांची सर्वार्थाने होणारी परवड थांबावी म्हणून. किंबहुना कोणत्याही संतांनी साहित्य लिहिलं ते याच कारणासाठी. स्वांतसुखाय, प्रसिद्धी किंवा पुरस्कारासाठी तर नव्हेच नव्हे. ज्ञानेश्वरीची पारायणे हरिपाठाचे अभंग गायन आजही गावोगावी होताना दिसते पण गरज आहे, त्यातील तत्त्वज्ञान अंगीकारण्याची. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी मधून सामाजिक जाणीवा तर मांडल्याच पण सृष्टीतील विविध घडामोडी विज्ञानाच्या अंगाने मांडल्या. मानवी जीवनाचा पर्यावरणाशी संबंध मांडला. या संदर्भात ज्ञानेश्वर स्वतःच म्हणतात

आपुनिया तळहातीचे रत्न जैसे । तुज ज्ञान सांगेन तसे

आपल्याकडील बहुतांशी संत हे विज्ञानवादीच होते. कोणत्याही संतांचा अवडंबराला विरोधच केला आहे. आजही तितक्याच प्रकर्षाने हे सारे समाजापुढे येणे गरजेचे आहे. तुकोबा म्हणतात

नाही निर्मळ जीवन । काय करील साबण किंवा<br>
गळ्यात तुळशीची लाकडे । आतून हरीशी वाकडे<br>
ही काय भावाला तारतील माकडे<br>
संत कबीर ही हाच भाव सांगतात<br>
नहाये धोयें क्या हुआ। जो मनमैल न जाये<br>
मीन सदा जल मे रहे । धोये बास न जाये

अध्यात्मिक उन्नती साधने म्हणजे संसाराचा त्याग करणे असा एक गैरसमज समाजात फ़ोफावलेला दिसतो. अर्थात तो पैलवतही नाही तरी देखील काही लोक त्याच्यामागे जातात आणि मग त्यांच्या अवस्था ना घर का ना घाट का अशी होते. अशावेळी या संतांचा विचारच आपल्याला मार्गदर्शक ठरतो. संत रामदास आवर्जून सांगतात.

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका<br>
येत आळस करू नका । विवेकी हो किंवा<br>
तुकोबांचा जोडूनिया धन उत्तम व्यवहारे ।

उदास विचारे वेच करी

यासारखी रचना एकाच वेळी प्रपंच व परमार्थ उत्तमरीत्या कसे करावे याचे मार्गदर्शन करतात. एकमेकाबद्दल आकस, इर्षा, असूया, लोभ ही आजच्या जगाची व्यवच्छेदक लक्षणे झाली आहेत. त्यावेळी आपण एकमेकांशी कसे वागावे याचेही ज्ञान संत आपल्या साहित्यातून देतात. आपली प्रगती करणे म्हणजे दुसऱ्याचे अधोगती करणे हा एक समज आजकाल जोमाने पसरतो आहे. अशावेळी रामदासांचे

जे जे आपणाशी ठावे ते ते दुसऱ्याशी शिकवावे ल
शहाणे करूनी सोडावे सकळजन

किंवा कबीरांचे

पोथी पढपढ पंडित भया न कोय ।
ढाई आखर प्रेम का पढे सो पंडित होय

संत एकनाथांनी तर आपल्या भारुडांच्या माध्यमातून अतिशय रसाळ सामान्यांना कळेल अशा सोप्या विनोदी भाषेत षडरिपुपासून दूर कसे राहावे ते सांगितले आहे. नैराश्य, मानसिक ताणतणाव ही आजकालच्या माणसाची दुखणी. त्यालाही उत्तर आपल्याला संत साहित्यात सापडते. रामदासांचा दासबोध किंवा मनाचे श्लोक आपल्याला या सर्वांवर उपाय म्हणून पाहता येतील. आपण नीतीने, सरळ मार्गाने आपले कर्म करीत गेलो तर या समस्याच आपल्याला उद्भवणार नाहीत. आजच्या स्पर्धेच्या युगात पावलोपावली आपल्याला निंदक भेटणारच या निंदकाकडे आपण सकारात्मकतेने कसे पहावे याबाबत संत एकनाथ म्हणतात, निंदक आमुची काशी । आमुची पातके अवघी नाशी

निंदकांची गंगा । आमुची पातके नेती भंगा
निंदका आमुचा सखा । आमची वस्त्र धुतो फुका

अनेक कारणांसाठी जाती-धर्माच्या नावाखाली माणसा माणसात फूट पडून सामाजिक अराजक माजले आहे. जाती व्यवस्थेला संतांनी मूठमाती दिली. महात्मा बसवेश्वर

एक राव दुजा रंक । याचा नगरीचे शोक

असा सारा भेद मिटवून टाकतात. कबीर म्हणतात,

जाती न पूछो साधु की । पूछ लिजिए ज्ञान
मोल करो तलवार का । पडी रहन दो म्यान

तुकोबाही

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ किंवा उच्चनीच काही नेणे भगवंत । तिष्ठतसे भाव भक्ती देखोनिया आपला विचार जाती-धर्म भेदाच्या पलीकडे जाऊन विश्वात्मक झाला पाहिजे हा एक प्रमुख विचार संतांनी दिला. संत ज्ञानेश्वरांनी तर विश्वात्मक देवालाच आळवले आहे. महात्मा बसवेश्वरांची शिकवण ही विश्वाला कवेत घेणारी होती. म्हणूनच बसवेश्वरांचा विचार केवळ कर्नाटक किंवा भारतापुरता मर्यादित न राहता इराण, इराक व अफगाणिस्तानापर्यंत जाऊन पोहोचला. आजकाल सैरभर झालेले अनेक लोक मनःशांतीसाठी अनेक भोंदू बाबांच्या आश्रयाला जाताना दिसतात

त्यांच्याकडून विविध प्रकारांनी नागावले जातात. अशावेळी संत किंवा साधू कोणाला म्हणावे याबद्दल तुकोबा म्हणतात

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा देव तेथेची जाणावा

आज-काल श्रीमंत वर्गीयांना आपल्या जाळ्यात ओढणारे अनेक तथाकथित साधुसंत गल्लीबोळात निर्माण झाले आहेत. त्यांच्यासाठी हा अभंग नक्कीच उपयोगाचा होईल सर्वांगीण नैतिक अध्यपतन हा आज गुणधर्म बनला आहे आणि त्यातून अनेक सामाजिक समस्यांनी डोके वर काढले आहे. अशावेळी संतसाहित्य काळाची गरज आहे. याचा सर्व पातळ्यांवरील अभ्यासक्रमात चोखंदळपणे समावेश केला पाहिजे. शालेय वयातच हा विचार आपण जर मुलांमध्ये पेरला तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत नक्कीच मोलाचे योगदान होईल. परद्रव्य परनारी यांच्या धरी विटाळ असे तुकोबा आवर्जून सांगतात.

किंवा रामदासांच्या मनाचे श्लोक आणि दासबोधातून आपल्या जीवनाला सुयोग्य आकार देण्याची शक्ती आहे. जनी निंद्य ते सर्व सोडून द्यावे। जनी वंद्य ते सर्व भावे करावे

यासारखे अतिशय सहज सोपी बोध पूर्ण रचना विद्यार्थ्यांना सहज आकलन होते तो आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग केला पाहिजे. तरच आजकाल ज्या अक्राळ विक्राळ समस्या आपल्या जीवनात घुसल्या आहेत त्यांचे निराकरण होईल. आजकाल सर्व जगाला भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास. वृक्षवल्ली आम्हा सोयरे। वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती

असा पर्यावरणवादी, पर्यावरणाशी सख्यत्वाचा संदेश तुकारामांनी दिला. ज्ञानेश्वरांचे अनेक दृष्टांत पर्यावरणाशी संबंधित आहेत.

संतांनी जो कर्मयोग सांगितला त्याला डावलून आपण शीघ्र यश मिळविण्याच्या मागे लागलो आहोत आणि त्यासाठी कोणताही मार्ग अवलंबायला आपण तयार आहोत. त्यामुळे अनेक संकटे पदरी पडत आहेत. जवळजवळ सर्व संतांनी कर्मालाच प्रामुख्याने महत्त्व दिले आहे त्यांनी आपल्या कामातच ईश्वर पाहिला. महात्मा बसवेश्वरांनी तर 'कायकवे कैलास' या सिद्धांताचा हिरीरीने पुरस्कार केला. कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी असे सावता माळी म्हणतो. थोडक्यात सांगायचे तर आज आपण लाखो रुपये करून जे व्यक्तिमत्व विकासाचे वर्ग किंवा क्लास करतो, ते सारं आमच्या संतांनी खूप पूर्वी अतिशय सुंदर शब्दात सांगून ठेवलय. रामदास तर

मुख्य हरी कथा निरूपण। दुसरे ते राजकारण
तिसरे ते सावध पण। सर्व विषयी

असा संपन्न व्यक्तिमत्त्वाचा मूलमंत्र सांगतात.

आजकाल मोठमोठ्या पदव्या घेऊन उच्चविद्याविभूषित म्हणून घेणारे संसारात मात्र उणे पडताना दिसतात. त्यामुळे वृद्धाश्रम, अनाथआश्रम, घटस्फोटाचे वाढते प्रमाण, अनैतिक संबंधातून हिंसाचार, अशी वाईट गोष्टींची शृंखलाच आपल्या दृष्टीस पडते. यातून आपली कुटुंबव्यवस्था मोडकळीस आली

आहे आणि अधिकाधिक गुंतागुंत वाढली आहे. भौतिक सुखे अमाप वाढली आहेत पण माणूस सुख, मनशांतीमनशांती, स्थैर्य यापासून वंचित झाला आहे. अशा विद्यार्थ्यांना रामदास म्हणतात

विद्या उदंडची शिकला प्रसंग मात्र चुकतचि गेला
तरी मग ते विद्येला । कोण पुसे?

अवडंबर म्हणजे भक्ती नव्हे तर भावभक्तीने परमेश्वराच्या चिंतनात लीन होणे. एवढा सोपा भक्ती मार्ग सांगून गरीब जनतेची अवडंबरापायी होणारी सर्वंकष दुर्दशा टाळण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आजही धर्म व भक्तीच्या नावाखाली अनेक जण लुटले जातात त्यांना

भावा पाशी देव उभा सर्वकाळ

किंवा

नामा म्हणे नाम साधकाची माता । जैसे तैसे घेता भक्ती जोडे
नाही याती वर्ण नाही वेदोक्त । नामेची संतृप्त होते होती जीव

असं नामदेव सांगतात

संतांचा उपदेश आणि रचना इतकी अप्रतिम आहे की अनेक रचनांच्या ओळी आपल्या जगण्यात म्हणी, सुभाषितासारख्या रूढ झाल्या आहेत.

लोहाचे कनक होये । हे सामर्थ्य परिसीच आहे- संत ज्ञानेश्वर
शिष्य केले पापा भोगावे गुरुने - संत नामदेव
सतीला पती दुसरा शोधवेना - संत रामदास
सर्पा पाजीले पियुष तेची परतोनी होय विष-संत एकनाथ
पुण्य परउपकार पाप ते परपीड- संत तुकाराम

ही काही मोजकी उदाहरणे वाणगीदाखल घेतली आहेत अन्यथा संपूर्ण संत साहित्य हे सुभाषितच आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये

हे सर्व पाहता संतांची भूमिका ही जागल्याची आहे. त्यांनी धर्माच्या आधारे समाज, संस्कृती सुधारणेचे काम केले. त्या संदर्भात संत तुकाराम म्हणतात,

काय मानू मी संतांचे उपकार । मज निरंतर जागविती